# जाहीर नोटीस

## रत्नागिरी येथील जिल्हा न्यायालयात

या जाहीर नोटीशीद्वारे असे कळविण्यात येते की, .....

जिल्हा न्यायालय, रत्नागिरी व अधिपत्याखाली येणा–या तालुका न्यायालयातील बेलिफ कर्मचारी यांना एक रेनकोट व एक लेदर बॅग मिळुन रुपये ३,०००/– च्या मर्यादित उधारीने खरेदी करणेचे आहे. तरी त्याकरिता याद्वारे दरपत्रके मागविणेत येत आहेत. आवश्यक असणा–या रेनकोटचा व लेदर बॅगचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

### रेनकोटचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. नं. | रेनकोट साईज | नग |
|---|---|---|
| १ | XL | १५ |
| २ | XXL | ३० |
| ३ | XXXL | ५ |
| ४ | XXXXL | ४ |
| | **रेनकोट एकुण नग** | **५४** |

### लेदर बॅगचा तपशील खालीलप्रमाणे

| अ. नं. | तपशील | नग |
|---|---|---|
| १ | लेदर बॅग | **५४** |

तरी ज्या कोणाला वर नमूद केलेप्रमाणे जिल्हा न्यायालय, रत्नागिरी व अधिपत्याखाली येणा–या तालुका न्यायालयातील बेलिफ कर्मचारी यांना रेनकोट नग–५४ व लेदर बॅग नग–५४ उधारीने योग्य दरात पुरविणे शक्य असेल त्यांनी खालील अटी व शर्तीस अधिन राहून ही नोटीस जिल्हा न्यायालयाचे नोटीस बोर्डावर प्रसिध्द केलेपासुन आठ दिवसांचे आत म्हणजेच ०९/०६/२०२६ पर्यंत सहाय्यक अधिक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी येथे समक्ष आणून दयाव्यात.

### दरपत्रकाबाबत अटी व शर्ती

१. दरपत्रक आवश्यक त्या संपूर्ण तपशीलासह तारखेसहीत मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे असावे. त्यामध्ये कर, वस्तूंची किंमत इत्यादीबाबी स्वतंत्र नमूद कराव्यात. तसेच दरपत्रकामध्ये किंवा लेटरहेडवर GST क्रमांक नमूद करावा व पॅनकार्ड ची झेरॉक्स प्रत दरपत्रकासोबत सादर करावी.

२. दरपत्रक बंद लखोटयातून असावे व लखोटा मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांचे नावे नमूद असावा. सदर लखोटयावर बेलिफ कर्मचारी यांचे रेनकोट व लेदर बॅग यांचे दरपत्रक असे नमूद असावे.

३. जाहीर नोटीस मधील दिलेल्या तारखेनंतर आलेली दरपत्रक विचारात घेतले जाणार नाही.

४. सर्वात कमीत कमी दराचे दरपत्रक ज्यांचे असेल त्यांची दरपत्रके विचारात घेणेत येईल. दरपत्रकामध्ये खाडाखोड करणेत येवू नये.

५. पुरविणेत आलेले रेनकोट व लेदर बॅग चांगल्या प्रतीचे असणे आवश्यक आहे. तसेच रेनकोट व लेदर बॅग खराब निघाल्यास ते नव्याने पुरविणे आवश्यक आहे.

६. पुरविणेत येणारे रेनकोट व लेदर बॅग चे दरपत्रक हे एकाच पुरवठादाराचे असावे. म्हणजेच रेनकोट व लेदर बॅग चे दरपत्रक स्वतंत्ररित्या पाठविणेत येउ नये.

७. पुरविणेत येणारे रेनकोट ची किंमत ही साइज प्रमाणे वेगवेगळी असू नये. म्हणजेच सर्व रेनकोटच्या साईजची किंमत एकच असावी.

८. महाराष्ट्र राज्य शासनाने जाहीर केलेल्या ब्लॅक लिस्टमधील पुरवठादारांनी निविदा भरु नये. अन्यथा कायदेशीर कारवाई केली जाईल.

९. सदरची जाहिरात मा. जिल्हा न्यायालय, रत्नागिरी या न्यायालयाच्या https://ratnagiri.dcourts.gov.in या संकेतस्थळावरती प्रसिध्द करणेत आलेली

१०. अपवादात्मक परिस्थितीत दरपत्रके नाकारण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा न्यायाधीश, रत्नागिरी यांना राहील.

आज दि. ०२/०६/२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी दिली.

DISTRICT COURT OF RATNAGIRI

दिनांक— ०२/०६/२०२६

**प्रभारी प्रबंधक,**
**जिल्हा न्यायालय, रत्नागिरी**
म.जा.क्र. वित्त 39 ६६ २०२६
जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
दिनांक— ०२/०६/२०२६

**<u>प्रत नोटीस बोर्डवर व वेबसाईटवर प्रसिध्दीसाठी—</u>**

१. सहाय्यक अधीक्षक (वित्त), जिल्हा न्यायालय, रत्नागिरी
२. जिल्हा संगणक प्रणाली प्रशासक, जिल्हा न्यायालय, रत्नागिरी.
३. मा. दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, रत्नागिरी.
४. मा. मुख्यन्यायदंडाधिकारी, रत्नागिरी.
५. मा. जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी.
६. मा. तहसिलदार कार्यालय, रत्नागिरी.
७. नगरपरिषद, रत्नागिरी.